


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २९, मंगळवार १७ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सहायता निधीची रक्कम वाढवा, रूग्णसंख्या अमर्याद करा

## खा. नीलेश लंके यांची लोकसभेत आग्रही मागणी

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी तसेच एका सदस्याची ३५ रूग्णांची मर्यादा हटवून ती अमर्याद करण्याची आग्रही मागणी नगरचे खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेत केली.**

लोकसभेत सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके म्हणाले, पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत देण्यात येणारी कमाल रक्कम तीन लाख रूपये आहे. आजाराचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी ही रक्कम पुरेशी नसून ही मर्यादा वाढविण्याची गरज आहे. पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीअंतर्गत एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. ही मर्यादा योग्य नाही. ही मर्यादा काढून टाकून ती अमर्याद करण्यात यावी अशी मागणी लंके यांनी केली.




■ पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी व रूग्णसंख्या अमर्याद करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेमध्ये केली.

### खा लंके यांचा कोटा ६ महिन्यात संपला !

एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. खा. नीलेश लंके यांनी या योजनेअंतर्गत शेकडो प्रस्ताव दाखल केले असून सहा महिन्यात त्यांचा कोटा संपला आहे. तर अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित मंत्री तसेच अधिकाऱ्यांची भेट घेउन प्रलंबित रूग्णांना मदत करण्याची गळ घातली आहे. त्याच पार्श्वभुमीवर सदस्यांसाठी अमर्याद कोटा देण्याची मागणी लोकसभेमध्ये केली आहे. विधानसभेत काम करताना खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत राज्यात सर्वाधिक रूग्णांना मदत मिळवून दिली असून पंतप्रधान सहायता योजनेतूनही जास्तीत जास्त रूग्णांना मदत मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत नेमण्यात आलेल्या पॅनलमध्ये रूग्णालयांची संख्या वाढविण्याची आवष्यकता आहे. ही संख्या लवकरात लवकर वाढवून एका तालुक्यात किमान एक रूग्णालय या पॅनलमध्ये घेण्याची मागणीही लंके यांनी केली.

पंतप्रधान राष्ट्रीय निधी अंतर्गत पाठविण्यात येणारे प्रस्ताव हे पोष्टाने मागविले जातात. त्यात बदल करून हे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात यावेत जेणेकरून रूग्णाला कमी वेळेत लवकरात लवकर आर्थिक मदत मिळू शकेल असेही लंके यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत एखादा विशेष बाब हा पर्याय असायला हवा. एखाद्या रूग्णाचा आजार सुचीमध्ये नसेल तर विशेष बाब या पर्यायातून त्या रूग्णाला मदत करता येईल. असेही लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

# ठेकेदारांचे लाड नकोत!

■ आमदार काशिनाथ दाते यांनी टोचले कान
■ पंचायत समितीमध्ये आढावा बैठक




■ आ. काशिनाथ दाते यांनी तालुक्यातील शासनाच्या विविध विभागांची आढावा बैठक घेतली.

पारनेर : प्रतिनिधी

**मला अधिकाऱ्यांकडून चांगल्या कामाची अपेक्षा आहे. ठेकेदारांच्या मनावर कामे करून त्यांचे लाड करू नका. शासनाच्या पैशांचा योग्य वापर झाला पाहिजे, कामांची नियमित देखरेख झाली पाहिजे असे सांगत लाच देउन अधिकाऱ्यांना खिशात घालणाऱ्या लबाड ठेकेदारांचे तसेच भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांचे आमदार काशिनाथ दाते यांनी अप्रत्यक्ष कान टोचले.**

विधानसभा सदस्य म्हणून निवड झाल्यानंतर प्रथमच आ. काशिनाथ दाते यांनी शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी आपले परखड मत मांडत आपल्या कामाची काय पध्दत राहिल हे पहिल्याच बैठकीत दाखवून दिले. यावेळी तहसिलदार गायत्री सैंदाणे, गटविकास अधिकारी दयानंद पवार, तालुका कृषि अधिकारी गजानन घुले, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, सुपा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड, सहा. निबंधक विकास जाधव, दुयम निबंधक डी.जी.गायकवाड, सार्वजनीक बांधकाम विभागाचे उपभियंता एस.बी.वसईकर, पारनेर पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक जे सी मुजावर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे, महावितरणचे उपअभियंता सारंग हातोळकर, आगार प्रमुख कुसकर, जयश्री उदावंत आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, सन २०२२ पासून काही विभागांची कामे अद्यापही प्रलंबित आहेत, काही अपुर्ण आहेत. ही कामे का थांबली, का झाली नाहीत याची माहीती घ्या, ही कामे पुर्ण करून घेण्यासाठी आपणास आढावा बैठका घ्याव्या लागतील. मला कामाचा अनुभव आहे तरीही मला तुमच्याकडून समजावून घ्यायचे आहे. मी सत्ताधारी पक्षाचा आमदार आहे. त्यामुळे शासनाकडून आपल्याला कोणतीही अडचण येणार नाही. आर्थिक अथवा प्रशासकीय बाबींची अडचण येणार नाही. शासनाचे मला पुर्ण सहकार्य असणार असे दाते म्हणाले.

### अवास्तव त्रास नाही

शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यत पोहचविण्यासाठी तुम्हाला आणि मला एकत्रीतपणे काम करायचे आहे. त्यामुळे कोणाला अवास्तव त्रास होणार नाही अशी माझी भुमिका असणार आहे. जी कामे होतील ती वेळेत आणि दर्जेदार झाली पाहिजेत, कोणाची तक्रार येणार नाही याची काळजी तुम्हाला घ्यावी लागेल.

### नियमित बैठका घेणार

मला अपेक्षित असलेला तालुका घडवायचा आहे. त्यासाठी मला तुमच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा आहे. ठेकेदारांच्या मनावर कामे करू नका शासनाचा पैसा आहे, त्याचा योग्य वापर झाला पाहिजे. कामाची नियमित देखरेख झाली पाहिजे. त्यासाठी प्रत्येक विभागाच्या स्वतंत्र बैठका घेण्यात येतील.

### १२३ कोटींचा पीक विमा

तालुक्यातील शेतकऱ्यांचा १२३ कोटी रूपयांचा पीक विमा मंजुर झाला. सप्टेंबर अखेर १०५ कोटी रूपयांचे वितरण झाले आहे. ७१ हजार हेक्टर क्षेत्रातील पीकांचा विमा उतरविण्यात आला. पैकी ५३ हजार शेतक-यांची खरीपाचा, १२ हजार हेक्टरवरील पीकासाठी ९ हजार ६२० शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता. एकूण१ लाख ४६ हजार खातेदारांनी या योजनेचा लाभ घेतला. शेतकरी अपघात विमा प्रस्तावांपैकी ५९ शेतकऱ्यांना ५४ लाख रूपयांचे वितरण करण्यात आले.

गजानन घुले, कृषि अधिकारी

# राधाकृष्ण विखे पाटलांनी सातव्यांदा घेतली कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ

## समर्थकांना महसूलमंत्रिपद मिळण्याची आशा

शिर्डी : प्रतिनिधी



**राज्याच्या विधानसभेत सलग आठ वेळा शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व आणि सात वेळा विविध विभागांच्या मंत्रिपदाची यशस्वी धुरा सांभाळणारे राधाकृष्ण विखे पाटील यांचा महायुतीच्या मंत्रिमंडळात रविवारी दुसर्यांदा झालेला समावेश नगरच्या राजकीय क्षेत्रात वर्चस्व सिद्ध करणारा ठरला आहे. राज्याचे मंत्री म्हणून विखे पाटील यांनी आजपर्यंतच्या राजकीय कारकीर्दीत सातव्यांदा शपथ घेतली. विखे पाटील यांना मंत्रिपद मिळणार यात कोणतीही शंका नव्हतीच; कोणत्या खात्याचे मंत्रिपद मिळते, याबाबत उत्सुकता मात्र आहे. मागील टर्मप्रमाणेच पुन्हा महसूलमंत्रिपद मिळण्याची आशा त्यांच्या समर्थकांना आहे.**

सहकार चळवळीची असलेली पार्श्वभूमी आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या राजकीय सामाजिक चळवळीतील एक कार्यकर्ता म्हणून वाटचाल करणारे विखे पाटील यांनी सहकार क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये पदे भूषवून या क्षेत्रात नवनिर्मिती केली. सहकाराबरोबरच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी आपल्या दूरदृष्टीतून संस्थांचा पाया अधिक भक्कम केला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यास पूर्ण झालेली ७५ वर्षे, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची ५० वर्षांची यशस्वी वाटचाल आणि सहकारी बँकिंग क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या प्रवरा सहकारी बँकेस पूर्ण झालेली ५० वर्षे या सर्वांत राधाकृष्ण विखे पाटील यांचे अभ्यासू नेतृत्व उपयुक्त ठरले आहे.

१९९५ पासून शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले. राहाता तालुक्याच्या निर्मितीपासून ते अलीकडच्या काळात स्थापन झालेले उर्वरीत पान ३ वर

# 'होय, मी नाराज आहे'!

■ छगन भुजबळ यांची संतप्त प्रतिक्रिया
■ राज्यसभेची ऑफर धुडकावली; मनधरणीचे प्रयत्न ■ पक्षात महत्त्वाचे पद मिळणार



नागपूर : प्रतिनिधी

**होय मी नाराज आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.होय मी नाराज आहे, पुढे काय करणार? मी पुन्हा सांगतो मी नाराज आहे असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.**

राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. यावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर भुजबळ यांनी हे उत्तर दिले आहे. मात्र, छगन भुजबळ यांची नाराजी दूर करण्यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रयत्न सुरू केले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता पक्ष संघटनेमध्ये भुजबळ उर्वरीत पान ३ वर

# शिरुरला प्रदुषणामुळे घोडनदीचे पात्र काळवंडले!

## राज्यातील प्रदूषित नद्यांच्या यादीत घोडचा समावेश
## केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सर्वेक्षण अहवाल

शिरुर : सतीश डोंगरे

**रांजणगाव एमआयडीसीतील कंपन्यांमधून दररोज लाखो लिटर रासायनिक सांडपाणी घोडनदीत सोडले जात आहे. त्यातून घोडनदीचा श्वास गुदमरत आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्वेक्षण अहवालत प्रदूषित नद्यांच्या यादीत घोडचा समावेश असल्याची धक्कादायक बाब समोर येऊनही गेली वर्षे भर यावर प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही न झाल्याने शिरुरला घोडनदीचे पात्र काळवंडले आहे. नदीतील पाण्यावर काळा तवंग जमा झाला असून त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**

शिरूर तालुक्याचे नैसर्गिक वैभव असलेल्या घोड नदीने तालुक्यातील अनेक गावांसह विशेषतः उर्वरीत पान ३ वर



### असा ठरतो नद्यांचा प्रदूषित पट्टा

देशभरातील नद्यांतील प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ नॅशनल वॉटर क्वॉलिटी मॉनिटरिंग प्रोग्राम राबवत असते. पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण किती आहे? यावर पाण्याचे प्रदूषण ठरविले जाते. यासाठी मंडळाकडून नद्यांतील पाण्याचे नमुने गोळा करत प्रयोगशाळेत त्यांची तपासणी केली जाते. त्यानंतर नद्यांचा प्रदूषित पट्टा ठरवला जातो. सर्वाधिक प्रदूषित नद्यांना उपाय योजने नुसार १ ते ५ पर्यंतचा प्राधान्यक्रम दिला जातो सर्वाधिक प्रदूषित नदी प्राधान्यक्रम १ मध्ये तर सर्वात कमी प्रदूषित नदी प्राधान्यक्रम ५ मध्ये समाविष्ट केली जाते. प्रदूषित नद्यांच्या यादीत घोड नदीचा प्राधान्य क्रमांक ३ नंबरला आहे.

### नदीचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी प्रत्येक गावाची !

शिरुरमधून वाहणारी घोडनदी ही ऐकेकाळी निखळ निर्मळ आणि नितळ अशी नदी होती. जुने लोक तिला गंगा म्हणून संबोधायचे. या नदीने तालुक्यात सुबत्ता आणली. अनेक गावे सुजलाम सुफलाम केली. याच नदीच्या नावावरुन येथील साखर कारखान्याला घोडगंगा हे नांव देण्यात आले. तसे प्रत्येक गावातून वाहणारी नदी ही त्या गावासाठीची गंगाच असते. तिचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी त्या गावानेच घेणे आवश्यक आहे. फक्त घोडगंगा किंवा घोडमाई एवढेच म्हणून चालणार नाही. या पूज्यभावाला कृतीची जोड देणे आवश्यक आहे.

हभप नवनाथ महाराज माशेरे प्रसिध्द किर्तनकार , आमदाबाद

# आ. कर्डिले यांना ''२०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दी इयर' पुरस्कार

## देशपातळीवरील जिल्हा बँकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट चेअरमन



नगर : प्रतिनिधी

**राज्य सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्या साठी इनजेनियस लीडरशिप समिट देशपांतळीवरील आयकॉनिकलीडर अवॉर्ड २०२४ या वर्षी गोव्यातील विंडफ्लॉवर रिसॉर्ट आणि स्पा वर्का या पंचतारांकित रिसॉर्ट येथे झाला.**

२०२४ चा देशपातळीवरील जिल्हा बँकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट चेअरमन म्हणून जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार शिवाजी कर्डिले यांना २०२४ बेस्ट उर्वरीत पान ३ वर



# युवा

## पतीसोबत सहकर्मचारी करतेय जास्तच जवळीक ?, परिस्थिती अशी हाताळा !

**नात्यांबाबत महिला खूप भावनिक असतात, यात शंका नाही. दुसरीकडे जेव्हा पती किंवा जोडीदाराचा प्रश्न येतो तेव्हा त्या अधिक संवेदनशील होतात. जर कोणी तुमच्या जोडीदारासोबत फ्लर्ट करत असेल तर ते कोणाला आवडेल ? मात्र असे होत असेल तर साहजिकच टाळी एका हातानं वाजत नाही. तुमच्या पतीसोबत त्याची सहकर्मचारी सतत फ्लर्ट करत असेल आणि तुम्हालाही याची जाणीव असेल, तर त्याबाबत वेळीच गंभीर होणे गरजेचे आहे**

काही महिलांना पुरुषांसोबत फ्लर्ट करण्यात मजा येते. जर तुमचा पती स्वतः तुम्हाला ही माहिती देत नसेल आणि तुम्हाला त्याच्या एखाद्या मित्राने ही माहिती दिली, तर याबाबत सतर्क होण्याची गरज आहे. आम्ही असे म्हणत नाही की तुम्ही तुमच्या पतीवर थेट संशय घेण्यास सुरुवात करा, पण प्रथम त्याच्याशी याबाबत बोलणे देखील महत्त्वाचे आहे. या लेखाद्वारे आपण काही टिप्स जाणून घेणार आहोत, ज्याद्वारे अशा परिस्थितीला कसे हाताळायचे याकरीता आपणास मदत मिळू शकते.

### आपल्या पतीशी संवाद साधा

पतीवर संशय घेण्याऐवजी त्याच्याशी मोकळेपणाने बोला आणि संपूर्ण गोष्ट न सांगितल्याबद्दल देखील विचारणा करा.



जर तुमच्या पतीला सहकर्मचारीसह फ्लर्ट करण्यात काहीही रस नसेल, तर तो तुमच्याशी बोलण्यास संकोच करणार नाही. याबद्दल तो अतिशय मनमोकळेपणाने तुमच्यासोबत संवाद साधेल. अशा परिस्थितीत तो तुम्हाला सॉरीही म्हणू शकतो. दुसरीकडे जर तुमच्या पतीने तुम्हाला आधीच सांगितले असेल आणि तुम्ही दोघेही नाराज असाल तर तुम्हीही त्या महिलेशी बोला आणि तिला इशारा देऊन दूर राहण्यास सांगा.

### मैत्रीचं नातं करा मजबूत


पती-पत्नीत मैत्रीचे नाते असणे गरजेचं आहे, जे काळाबरोबर अधिक घट्ट होत गेले पाहिजे. जर एखादी महिला तुमच्या पतीसोबत फ्लर्ट करत असेल आणि तुमच्या पतीने तुम्हाला याबद्दल सांगितले नसेल तर तुम्ही त्यांच्यासोबतचे नाते मजबूत करावे. मग शांतपणे याबद्दल त्याला विचारा. तुमच्यामध्ये संवादच होत नसेल तर कदाचित तो तुम्हाला हे सांगू शकणार नाही. पती-पत्नीचे नाते मजबूत झाल्यानंतर तुमच्या पतीची सहकर्मचारी स्वतःच त्यांच्याशी फ्लर्ट करणे थांबवेल.

### एकमेकांना वेळ द्या

वैवाहिक जीवनात अनेकदा तुम्ही कामाच्या गडबडीत स्वतःसाठी वेळ काढायला विसरता आणि अशा परिस्थितीत जोडप्यांचे नाते कमकुवत होत जाते. आपल्या पतीसोबत जास्तीत जास्त वेळ घालवा. तुमचा पतीही सहकर्मचाऱ्याच्या फ्लर्ट करण्याच्या सवयीमुळे त्रस्त असेल आणि तुम्हालाही आपल्या नात्यासाठी भीती वाटत असेल, तर यासाठी तुम्हा दोघांनाही स्वतःच्या नात्यावर लक्ष केंद्रित करणं आवश्यक आहे. तरच दोघांत तिसरा व्यक्ती येणार नाही.


### विश्वास ठेवा

विश्वास हा प्रत्येक नात्याचा पाया असतो, असं नेहमी म्हटलं जातं. आपल्या पतीवर विनाकारण संशय घेऊ नका, उलट त्याच्याशी संवाद साधण्याचा विचार करा. काही शंका असल्यास इतर लोकांशी चर्चा करू नका, याउलट आधी पतीशी बोला. जर तो संकोच व्यक्त करत असेल तर याबद्दल गंभीर व्हा आणि घरातील सदस्यांनाही सांगा. पण आधी पतीला कळू द्या की तुमचा त्याच्यावर किती विश्वास आहे. तुमचा त्याच्यावरचा विश्वास पाहून तो स्वतः फ्लर्ट करणाऱ्या महिलेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करू लागेल.




## लग्नाच्या काही वर्षांनंतर जोडप्यांमध्ये का येतो दुरावा ?

**जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीवर प्रेम करता तेव्हा तुम्हालाही त्यांच्यासोबत राहायला आवडते, यात शंका नाही. अशाच व्यक्ती त्यांचे नाते लग्नापर्यंत घेऊन जातात, दरम्यान लग्नानंतर जोडप्यांमधील गोष्टी आधीसारख्याच राहतील, असा काही नियम नाहीय. प्रेमाच्या सुरुवातीच्या काळात प्रत्येक जोडप्यामध्ये सर्वकाही ठीक असल्याचे दिसते, परंतु कालांतराने जर तुम्ही एकमेकांवर अधिकार गाजवण्यास सुरुवात केली किंवा तुमच्या जोडीदाराचा अपमान करणे तुम्हाला सामान्य वाटत असेल तर नात्यातील अंतर वाढू लागते. कधीकधी गैरसमजामुळेही जोडीदारासोबतच्या नात्यात दुरावा निर्माण होऊ लागतो. यामुळेच लग्नाच्या काही वर्षांनंतर पती-पत्नीला एकमेकांशी संवाद साधायला आवडत नाही. पण आपण आपले नाते योग्य पद्धतीने जपले, तर अशा परिस्थितीचा सामना करावा लागणार नाही**



- कौतुक करणे आवश्यक : जेव्हा तुम्ही गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड यासारख्या रिलेशनशिपमध्ये असता तेव्हा तुम्ही अनेकदा एकमेकांचे कौतुक करताना दिसतात. पण लग्नानंतर अनेकदा जोडपी या गोष्टी कमी करू लागतात. म्हणून एखाद्या गोष्टीसाठी धन्यवाद म्हणणे किंवा स्तुती करणे खूप महत्त्वाचे आहे. असे केल्यास तुमच्या जोडीदाराचा मूड चांगला राहील. जेव्हा तुमचा पार्टनर तुमच्यासाठी काही खास करतो, तेव्हा तुम्हाला त्यांचे आभार मानायला हवेत. हवे असल्यास आपण त्यांना भेटवस्तू देऊन त्यांचे आभारही मानू शकता. पण अनेकदा लोक या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांच्या नात्यातील भावना संपुष्टात येऊ लागतात.
- अहंकार सोडून सॉरी म्हणायला शिका : अनेकदा जेव्हा लोक नातेसंबंधात अहंकार आणतात, तेव्हा त्यांचे पार्टनरसोबतचे नाते तुटू लागते. जर तुमची काही चूक असेल तर तुम्हाला त्यांना सॉरी म्हणायला अजिबात संकोच वाटू नये. प्रत्येक जोडप्यामध्ये भांडणे होतात, परंतु तुमच्या नात्यातील प्रेम टिकून राहण्यासाठी वाद लवकरात लवकर संपला पाहिजे. त्यामुळे सॉरी म्हणायला शिका.
- एकमेकांचा सल्ला घ्या : पती-पत्नीने एकमेकांचा सल्ला घेणे खूप महत्त्वाचे आहे. यामुळे दोघांमधील मैत्रीचे बंधही घट्ट होतात. पण लग्नानंतर अनेकदा जोडपी एकमेकांचा सल्ला घेताना स्वतःचा अहंकार मधे आणतात आणि स्वतःच्या जोडीदाराला काहीही विचारायला त्यांना संकोच वाटतो. मोकळेपणाने संवाद साधण्याची क्षमता असलेल्या जोडप्यांचं नाते दीर्घकाळ टिकते. लग्नानंतर तुमचा जोडीदार हा तुमच्या आयुष्याचा एक भाग आहे हे तुम्ही समजले पाहिजे, त्यामुळे तुम्ही त्याच्याशी काहीही बोलण्यास अजिबात संकोच व्यक्त करू नका.
- जोडीदारावर अधिकार गाजवणे थांबवा : पती-पत्नीचा एकमेकांवर पूर्ण अधिकार आहे यात शंका नाही, पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमच्या जोडीदारावर अनावश्यक अधिकार गाजवाल. लग्नानंतर काही वर्षांनी जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत वाईट वागू लागता आणि त्यांना सतत बंधन घालण्याचा प्रयत्न करता किंवा वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करता, नात्यात दुरावा निर्माण होऊ लागतो. तुमच्या जोडीदाराच्या भावनांचा आदर करा आणि त्यांच्या विचारांचा-मतांचा आदर करा. जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला आदर द्याल तेव्हा तेही तुमच्या मतांचा आदर करतील.



## महिलांच्या कोणत्या सवयी पुरुषांना करतात आकर्षित !

**आजच्या युगात आकर्षक हा शब्द स्टाइल टॅग बनला आहे, दरम्यान या शब्दाची प्रत्येकाची व्याख्या वेगवेगळी असू शकते. केवळ महिलांच्या हॉट लुकसाठीचा हा शब्दाचा वापर केला जातो, असे मुळीच नाहीय. तर अशा कित्येक गोष्टी ज्या तुम्हाला आवडत असतील, त्याकरिताही आकर्षक हा शब्द वापरला जातो. तुमचं वर्तन, सवयी, संवाद साधण्याची शैली, पेहराव आणि तुमची जीवनशैली यावर सारं काही अवलंबून असते. दुसरीकडे तोकडे ड्रेस परिधान करणाऱ्या महिलांकडे पुरुष जास्त आकर्षित होतात, असे अनेकदा म्हटले जाते. पण काही पुरुषांना त्यांच्या विनोदावर हसणाऱ्या व शारीरिकदृष्ट्या मजबूत असणाऱ्या महिला अधिक आकर्षक वाटतात. म्हणूनच जेव्हा लग्नाचा विषय येतो तेव्हा मुलांची विचारसरणी पूर्णपणे बदललेली दिसते. बोल्ड आणि आकर्षक कपडे परिधान करणाऱ्या महिलांपेक्षा पुरुष त्यांच्यातील खास सवयींकडे अधिक आकर्षित होतात. चला जाणून घेऊया महिलांच्या कोणत्या सवयी आहेत, ज्या पाहून पुरुषांना आकर्षक वाटतात...**

- विनोदावर हसणे : पुरुषांना बरेचदा विनोद करण्याची सवय असते, पण जर एखाद्या मुलीने त्यावर प्रतिक्रिया दिली नाही तर संबंधित व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात विशेष आवडत निर्माण होत नाही. मग आपण कितीही आकर्षक दिसत असाल तरीही. आपल्या विनोदावर मनमोकळेपणाने हसणाऱ्या महिला पुरुषांना आवडतात. जेव्हा तुम्ही त्यांच्या एखाद्या विनोदावर हसता तेव्हा त्याचे सर्व लक्ष तुमच्यावर केंद्रित होते. आपण त्यांच्या विनोदामुळे हसत आहात, हे त्यांना खूप आकर्षित करते.



- लहान मुलांसोबत वेळ घालवणे : तुम्हाला हे ऐकायला थोडं विचित्र वाटेल, पण लहान मुलांसोबत खेळणाऱ्या महिला पुरुषांना खूप आवडतात. जर तुम्हाला मुलं आवडत असतील आणि तुम्हाला त्यांच्यासोबत खेळायलाही आवडत असेल, तर तुमची ही सवय पुरुषांना खूप आकर्षित करते. तुमचा त्या माणसाशी काहीही संबंध नसला तरीही तुम्हाला मुलांनी वेढलेले पाहून ते तुमच्यावर फिदा होतात.
- वर्कआउट करणाऱ्या महिला : आजकाल बहुतांश महिला वर्कआउट करतात, पण काही व्यायाम असे आहेत; जे महिलांची इच्छाशक्ती आणि शारीरिक ताकद दर्शवतात. व्यायाम करणारी प्रत्येक महिला पुरुषांना आकर्षक वाटेल, असे नव्हे. पण तुम्हाला कठीण व्यायाम प्रकार करताना पाहून पुरुष मंडळी प्रभावित होतात.
- शरीरावर टॅटू असणाऱ्या तरुणी : बहुतांश पुरुषांना आपल्या शरीरावर टॅटू काढायला आवडते. पण जेव्हा एखादी मुलगी असे करते तेव्हा ही गोष्ट पुरुषांना खूप आकर्षित करते. टॅटूची आवड असणाऱ्या तरुणींकडे पुरुष आकर्षित होतात, यात मुळीच शंका नाहीय. शरीरावर टॅटू असणाऱ्या मुलींनी काहीही बोलल्यास ते पुरुषांना खूप मादक वाटते. धाडसी आणि स्वभावाने थोड्याशा वेगळ्या असणाऱ्या तरुणी पुरुषांना खूपच आवडतात.



## प्रेमात फसवणूक झालेल्या महिलांच्या पाच गोष्टी

**जेव्हा एखादी महिला प्रेमप्रकरणात विश्वासघाताचा सामना करते, त्यावेळेस ती आपली पुढील पावले अतिशय काळजीपूर्वक उचलते. जर तुम्हाला अशा महिलेच्या आयुष्याचा एक भाग बनायचे असेल तर आधी तुम्हाला काही महत्त्वाच्या गोष्टी समजून घ्याव्या लागतील. जेणेकरून तुम्हाला अशा महिलांच्या मनाची परिस्थिती जाणून घेण्यास मदत मिळेल...**

जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात पडता आणि त्यानं तुमचं मन दुखावल्यास आपला प्रेमावरील विश्वास पूर्णपणे उडतो, यात शंका नाही. नात्यांवरील विश्वास गमावल्याने आपण पूर्णतः कोलमडता, पण अशा वेळेस तुमच्या आयुष्यात एखादी व्यक्ती आली तर त्याने तुम्हाला समजून घेण्याचा प्रयत्न करावा, अशी तुमची अपेक्षा असते. अशा परिस्थितीत पुरुषांनीही आपल्या जोडीदाराची काळजी घेतली पाहिजे. जर तुम्ही समोरच्या व्यक्तीवर प्रेम करत असाल तर त्यांच्या कठीण प्रसंगी त्यांचा आधार होणे तुमचे कर्तव्य बनते. बरेचदा बहुतांश महिला ब्रेकअप किंवा फसवणुकीनंतर दुसरे नाते स्वीकारतात तेव्हा भूतकाळातील अनुभवावरून त्या आपल्या जोडीदारावर संशय घेऊ लागतात. अशा परिस्थितीत दुरावण्यापासून त्यांचे मन समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर तुम्ही प्रेमात असाल किंवा नात्यातल्या कोणत्यातरी मोठ्या फसवणुकीचा बळी ठरलेल्या महिलेचं मन जिंकण्याचा प्रयत्न करत असाल तर याकरिता आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न करावे लागतील.

### विश्वास बसल्यासच देतात संधी

जेव्हा एखाद्या महिलेला प्रेमात फसवणूक किंवा विश्वासघाताचा सामना करावा लागतो, अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीवर विश्वास बसल्यानंतरच ती तुमच्यासोबतच्या नात्यास संधी देते. एखाद्या महिलेसाठी तुमच्यावर विश्वास ठेवणे ही छोटी गोष्ट नाहीय, हे समजून घ्या. कारण अशा वेळेस तिला मनातील सर्व गोष्टी तुमच्यासोबत शेअर करताना भीती वाटत नाही. याचा अर्थ ती तुमच्यासोबतच्या तिच्या नात्याबद्दल विचार करत आहे, त्यामुळे याकडे दुर्लक्ष करण्याची चूक करू नका.

### मनातील वेदना व्यक्त करते

जेव्हा एखाद्या महिलेचं मन खूप वेळा दुखावले जाते, तेव्हा ती तुमच्यासोबत नाते पुढे नेण्यास घाबरते, असे मुळीच नसते. पण तिला तिच्या मनातील गोष्टी तुमच्यासोबत शेअर करायच्या असतात. प्रेमात फसवणूक झालेल्या महिलेला तिच्या भूतकाळाबद्दल तुमच्यासमोर रडायचे नसते. तिला केवळ सर्व गोष्टी तुमच्यासोबत शेअर करायच्या असतात. ती तुम्हाला तिच्या आयुष्यात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करत असते म्हणून ज्या गोष्टींची भीती वाटते त्याबद्दल तिला तुम्हाला सर्व काही सांगायचे आहे, जेणेकरून त्या पुन्हा घडू नयेत.

### मन पुन्हा दुखावले जाऊ नये, याचा प्रयत्न

जेव्हा जवळचा व्यक्ती एखाद्या महिलेचं मन दुखावतो,तेव्ही ती वाईटरित्या कोलमडते. अशा परिस्थितीत आपण पुन्हा दुखावले जाणार नाहीत, याची काळजी ती घेत असते. ज्यामुळे कधीकधी ती तुम्हाला थोडी अंतर्मुख वाटू शकते, परंतु या मागचे कारण तिचा भूतकाळातील अनुभव आहे. ब्रेकअप होण्यापासून रोखण्यासाठी त्यांच्याकडे अनेक कारणे असू शकतात, म्हणून त्यांच्यावर शंका घेण्याऐवजी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.

### प्रेमाची असते आवश्यकता

दुःखातून बाहेर आलेल्या महिलेला तुम्ही अनेक गोष्टी समजावून सांगता आणि त्या तिलाही समजतात. पण कधी कधी तुम्ही असे काही शब्द देखील वापरता ज्यामुळे त्यांची खूप निराशा होते. अशा महिलेला केवळ एक जोडीदार हवा असतो, जो तिच्याकडे पूर्णपणे लक्ष देऊ शकेल, तिची काळजी घेईल. आपण अशा व्यक्तीसोबत आहोत, ज्यासोबत आता घाबरण्याची आवश्यकता नाही, याची जाणीव त्यांना होणे आवश्यक आहे.

### थोडा वेळ लागू शकतो

प्रेमात फसवणूक झालेल्या महिलेसाठी आपला स्वभाव कसा आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. ती तुम्हाला दुरूनच जाणून घेण्याचा प्रयत्न करते. तुम्ही या बाबतीत संयम बाळगला पाहिजे, जेणेकरून त्यांना तुम्हाला समजून घेण्यासाठी वेळ मिळेल. कित्येकदा तुम्हाला वाटेल की तिला तुमच्यासोबत राहण्यात अजिबात रस नाही, पण नंतर तिला निराश व्हावे लागू नये म्हणून ती असे करते.



## शॉर्ट न्यूज

### नागरिकांनी ध्वजदिन निधीसाठी योगदान द्यावे

**नगर :** देशासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनी ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धार्थ साळुंखे यांनी केले. जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी साळुंखे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

### आश्रमशाळा क्रीडा साहित्य प्रदर्शनाचे आयोजन

**अकोले :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजूरअंतर्गत चालवल्या जाणाऱ्या २१ शासकीय व १७ अनुदानित आश्रमशाळांतील केंद्रस्तरीय स्पर्धेतून निवड झालेल्या १ हजार ४० विद्यार्थ्यांच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रकल्पस्तरीय क्रीडा समितीच्या अध्यक्षा तथा राजूर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी दिली. मवेशी शैक्षणिक संकुलात दि. १५ ते १८ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या क्रीडा स्पर्धेत, क्रीडा प्रकार १४, १७ व १९ वयोगटांत या स्पर्धा होणार आहेत.

### प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी गायकवाड यांची फेरनिवड

**नेवासा :** प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी पत्रकार मोहन गायकवाड यांची सार्वनुमते फेर निवड करण्यात आली आहे. प्रेस क्लबचे संस्थापक अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हि निवड करण्यात आली. या बैठकीत पत्रकारांसाठी विविध उपक्रम विषयी चर्चा, विविध विषयांवरील पत्रकार परिषदांचे आयोजन आणि पत्रकार परिषदांसाठीचे नियोजन, शहरातील पत्रकारांचे प्रलंबीत प्रश्न, पत्रकारांच्या संरक्षण कायद्याचा पाठपुरावा, गेल्या अनेक वर्षा पासून प्रलंबीत असलेल्या पत्रकार वसाहतीचा प्रश्न या बाबत चर्चा करण्यात आली.

### २१ ते २३ डिसेंबरपर्यंत कला महोत्सवाचे आयोजन

**संगमनेर :** निरोगी व सुदृढ समाज निर्मितीसाठी कार्यरत असलेल्या जयहिंद लोकचळवळीच्यावतीने माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांना व्यवसायपूर्व कलाकौशल्याची संधी मिळावी याकरिता २१ डिसेंबर ते २३ डिसेंबर, २०२४ या काळात क्रीडा संकुल येथे कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ७ हजार २०० विद्यार्थ्यांचा समावेश असून हे सर्व विद्यार्थी एकाचवेळी देशभक्तीपर गीतगायन करणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक तथा माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी दिली.

### गणेश भोस यांची बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत श्रीरामपूर येथे दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या आंतर विभागीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचा बॉडी बिल्डर गणेश माणिक भोस याने ९० किलो वजन गटामध्ये उल्लेखनीय कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळविला व त्याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. गणेश याने मागील वर्षी कालिकत येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉडी बिल्डिंग स्पर्धेत ब्रॉन्झ मेडल प्राप्त केले होते.

# ऊसातील बदलेला बिबट्या



जुन्नर तालुका हा कृषी प्रधान तालुका, एकाच तालुक्यात पाच धरण त्यामुळे शेतकऱ्याची प्रगती झाली ही नाकारता येणार नाही.

उसाची शेती निवडलेला पर्याय हा शेतकऱ्यांसाठी या भागात चांगलाच लख लाभ लाभला. परंतु दुसऱ्या बाजूला बिबट्याचं अधिवास नष्ट होऊन आपण प्रगत झालो हे कळालेच नाही. बिबट्या सुद्धा कुठे मागे राहिला त्याने सुद्धा स्वभावानुसार स्वतःला या उसाच्या शेतात ॲडजस्ट केले. हेच तर सांगायचंय तुम्हाला...

मागील २० वर्षापासून हा बिबट्या आपल्या सोबत उसात राहायला लागला, या बिबट्याची तिसरी पिढी सुरू असेल ऊसातील वास्तव करण्याची. बिबट मादी इथेच प्रजनन करू लागली व पिलं देऊ लागली, ही बिबट पिल्ल आपल्याला पाहत मोठी होऊ लागली. त्यांना जंगल माहीत नाही. पिल्लांना त्यांची आई दोन वर्षे पर्यंत शिकविते कुठे जायचे, कुठे पाणी पियाचे, कोणापासून लपून राहायचे, कुठे खाद्य मिळणार हे सगळे प्रशिक्षण आई देते. ही पिल उसातच वाढत आहेत व हे त्यांचंच घर आहे म्हणून राहत आहेत. त्यांना जंगल माहीतच नाही. ऊसातील बिबट्याने स्वतः मध्ये पूर्ण बदल घडवून आणला.

पहिले जंगलात हरीण, ससा खाणारा बिबट्या आता कुत्रा, मांजर, शेळी, मेंढी, डुकरी अगदी काहीच मिळाले नाहीतर उंदीर, घुस खायला लागला व त्याचे ते प्रमुख अन्न झाले. बिबट्याचे पिल्ल स्वभावता ऊस आपले घर मानू लागले व खेळतांना उसाच्या बाहेर येऊन मस्ती करतांना आपल्या शेतकरी बांधवाना दिसु लागले.

जंगलात खूप श्रम करणारा हा बिबट्या, उसामध्ये येऊन आळशी झाला असे म्हटले तर नवल वाटणार नाही. बिबट्याने खाद्य बरोबर स्वतः मध्ये बदल सुद्धा केले , एरवी बिनधास्त जंगलात वावरणारा हा प्राणी उसामध्ये मात्र भिऊन राहायला लागला. शेतकरी कधी शेतात येतो, कधी जातो, काय करतो. हे सगळं अभ्यासून तो बाहेर पडु लागला व शिकार करून परत उसामध्ये बसू लागला.ऊसातील घाबरट बिबट्या आता मानवाच्या जीवनमानानुसार वागतोय.

तो घाबरट नसता तर जुन्नर तालुक्यात रोज एक मानवी हल्ला झाला असता. मादी बिबट्या समोर तर मोठ मोठे आव्हान उभे राहिले. प्रजनन केलेल्या स्वतःच्या पिलांना संभाळणे, त्यांना ऊस तुटत असताना हलविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांची खाद्याची काळजी घेणे, हे सर्व आव्हानाला सामोरे जात ती मादी बिबट आज उसात आपली पिल्लं मोठी करते.

बिबट्याला मानवा सोबत उसाच्या अवती भवती राहताना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. भक्ष्याचा पाठलाग करतांना विहिरीत पडणे, पिंजऱ्यात अडकने, घरात चुकून शिरणे, इत्यादी. या सगळ्या आव्हानांना पेलत त्या बिबट्याला आपल्या सोबत जगायचं आहे.बदलेल्या राहणीमानानुसार बिबट्या आता मानवा समोर येऊन शिकार करण्यास सुद्धा डगमगताना दिसत नाही.ऊस तोडणी सुरू झाली की आपले घर बदलायचे हे सुद्धा त्यांना माहीत झाले, व ते दुसरीकडे म्हणजेच दुसऱ्या उसात आसरा घेऊ लागले. ऊस तुटला म्हणजे शिफ्ट व्हायचे हे त्यांनी अंगवळणी पडलंय बहुदा.

पुस्तकी ज्ञान असणारे बरेच बिबट अभासकच्या सर्व थेअरी या ऊसातील बिबट्याने गुंडाळून ठेवण्यास भाग पाडले व नवीन अभ्यास करावा करा असे सुचविले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बिबट्या हा स्वतःचा प्रदेश तयार करतो , व त्याचा हा प्रदेश ५ स्केअर मीटरचाकिंवा असतो हे पूर्ण पणे चुकीचे ठरविले येथील ऊसातील बिबट्याने. आपण मोठं मोठे वाडे सोडून आता जशे फ्लॅट मध्ये आलो तसेच या बिबट्याने सुद्धा घर छोटे केले. आणि ते दुसरे तिसरे नसून उसाचे घर.ऊसातील मिळालेला छान आसरा, योग्य पोषक हवामान व खाण्यासाठी मिळालेले सहज भक्ष यामुळे त्याच्या शरीर यष्टी व जीवशास्त्र या मध्ये बदल निश्चित झाले असे जाणवते. यावर निश्चित नव्याने अभ्यास व्हावा हा बदलेला बिबट सुचवितो की काय असे वाटते व ते खरे आहे.

कालानुरूप बिबट्याने केलेले स्वतः मध्ये बदल खरच महत्वाचे आहे. बिबट्याच्या जगण्याच्या लढाई मध्ये त्याने स्वतः मध्ये हे बद्दल घडवून आणले. संघर्ष जगण्याचा त्या प्राण्याला कुठे आणून ठेवले हे त्याला सुद्धा कळाले नसेल.

आज तो मानवाला विचारतोय तुमच्यासाठी मी इतका बदलोय तुम्ही माझ्यासाठी बदलणार का? आता ही वेळ आहे मानवाला कटू सत्य स्वीकारण्याची आपण ज्याचे क्षेत्र हिरावून घेतले व प्रगती केली त्या प्राण्याला आपल्या सोबत जगू दयायचे की? नाही?

हा प्रश्न घेऊन हा ऊसातील बदलेला बिबट्या तुमच्या समोर उभा आहे.सहजीवन मागतोय बदलेला बिबट्या !

**डॉ. अजय देशमुख**

# फक्त आठवी पास भरत गोगावले सर्वात कमी शिकलेले मंत्री!

### १८ जण पदवीधर, ९ जण बारावी दोघे दहावी पास ५ जण पदव्युत्तर पदवीधारक

**नागपूर : प्रतिनिधी**

**राज्याच्या मंत्रिमंडळाचा महाविस्तार रविवारी उपराजधानी नागपूरमध्ये पार पडला. ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. नव्या मंत्रिमंडळातील तब्बल २३ मंत्र्यांवर गुन्हे नोंद आहेत. ९ मंत्री बारावीपर्यंत शिकलेले आहेत, तर दोन जण दहावी पास आहेत. ५ मंत्री हे पदव्युत्तर पदवी मिळवलेले आहेत, तर चार जणांनी पदविका पूर्ण केली आहे. १८ जण पदवीधर आहेत. फक्त आठवी पास भरत गोगावले हे सर्वात कमी शिकलेले मंत्री आहेत. शिंदे सरकारमध्ये त्यांनी मंत्रिपद मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले होते. पण त्यांना यश मिळाले नाही. शेवटच्या टप्प्यात त्यांना एकनाथ शिंदे यांनी एसटी महामंडळाचे अध्यक्षपद दिले होते.**



महायुतीचे सरकार आल्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराकडे लक्ष लागले होते. कुणाला संधी व कुणाला डच्चू मिळतो यावर चर्चा झडत होत्या. अखेर, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला उपराजधानी नागपूरमध्ये रविवारी मंत्रिमंडळाचा महाविस्तार पार पडला. भाजप, शिवसेना व राष्ट्रवादीच्या ३९ आमदारांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. दिव्य मराठीने या ३९ मंत्र्यांच्या शिक्षण, वय, गुन्हे व संपत्तीची त्यांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीवरून विश्लेषण केले.

**७ वकीलही मंत्रिमंडळात**

महायुती मंत्रिमंडळात सात वकील आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वकील असून त्यांच्याशिवाय ६ जणांनी वकिलीची पदवी घेतली आहे. पंकज भोयर हे डॉक्टरेट मिळवलेले एकमेव मंत्री आहेत.

**नाईक सर्वात ज्येष्ठ, अदिती सर्वात तरुण**

मंत्रिमंडळात १६ मंत्री साठीपार असून भाजपचे नवी मुंबईतील नेते, ७४ वर्षीय गणेश नाईक हे सर्वात ज्येष्ठ मंत्री असणार आहेत, तर अजित पवार गटाच्या ३६ वर्षीय अदिती तटकरे सर्वात तरुण मंत्री आहेत. तटकरे यांची मंत्रिपदाची दुसरी टर्म आहे.

**२३ मंत्र्यांवर गुन्हे, नितेश राणेंवर सर्वाधिक**

३८ शपथ घेतलेल्या ३९ पैकी २३ मंत्र्यांवर विविध प्रकारचे गुन्हे नोंद आहेत. यात भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यावर सर्वाधिक ३८ गुन्ह्यांची नोंद आहे. त्यांच्यानंतर भाजपच्या मेघना बोर्डीकर यांच्यावर १२ आणि शिवसेनेचे प्रताप सरनाईक यांच्यावर ९ गुन्ह्यांची नोंद आहे. १६ मंत्र्यांवर एकही गुन्ह्याची नोंद नाही.

**सर्वात श्रीमंत : मंगलप्रभात लोढा, सर्वात गरीब : दादा भुसे**

भाजपचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे सर्वात श्रीमंत मंत्री असून त्यांची एकूण संपत्ती ४४७ कोटी ९ लाख २३ हजार रुपये इतकी आहे. त्यानंतर शिवसेनेचे प्रताप सरनाईक यांचा नंबर असून त्यांची संपत्ती ३३३ कोटी ३२ लाख ९५ हजार रुपये इतकी आहे. तिसऱ्या क्रमांकावर भाजपचे शिवेंद्रराजे भोसले असून त्यांची संपत्ती १२८ कोटी ४१ लाख ८१ हजार रुपये इतकी आहे, तर शिवसेनेचे दादा भुसे सर्वात गरीब मंत्री असून त्यांची संपत्ती १ कोटी ६० लाख ८५ हजार रुपये इतकी आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळेंना गदिमा पुरस्कार प्रदान

### गदिमा म्हणजे ईश्वरी स्पर्श लाभलेले कवी । ज्येष्ठ नाटककार श्रीनिवास भणगे यांचे प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

**अवघे ५८ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या गदिमांनी त्यांच्या कारकिर्दीत हजारच्यावर गीते, गीतरामायण सारखे महाकाव्य, कथा, पटकथा, संवाद लेखन असे प्रचंड काम केले. त्यांची कामावरील निष्ठा आणि कष्ट यांचा अवमान न करता सृजनशील क्षेत्रातील त्यांचे अफाट काम पाहून, जणू त्यांना ईश्वरी स्पर्श लाभला होता, असे म्हणता येईल, असे मत ज्येष्ठ नाटककार श्रीनिवास भणगे यांनी व्यक्त केले.**



ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना गदिमा पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतर वासुंदे येथील कलाशिक्षक संतोष क्षिरसागर यांनी रेखाटलेले चित्र भेट देण्यात आले.

गदिमा प्रतिष्ठानतर्फे आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित आयोजित करण्यात आलेल्या गदिमा स्मृती समारोहात ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाचा गदिमा पुरस्कार, तर दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या पत्नी प्रिया लक्ष्मीकांत बेर्डे यांना गदिमांच्या पत्नी विद्याताई माडगूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा गृहिणी सखी सचिव पुरस्कार देण्यात आला.

तसेच प्रसिद्ध कथा, पटकथा, संवादलेखक आणि गीतकार क्षितीज पटवर्धन यांना यंदाचा चैत्रबन पुरस्कार, तर प्रसिद्ध गायिका मनीषा निश्चल यांना विद्या प्रज्ञा पुरस्कार देण्यात आला, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून भणगे बोलत होते.


टिळक स्मारक मंदिरत आयोजित या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पुरस्कारार्थींसह गदिमा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर उपस्थित होते.२१ हजार रूपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे गदिमा पुरस्काराचे स्वरूप आहे. अकरा हजार रूपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे गृहिणी सखी सचिव या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर पाच हजार रूपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे चैत्रबन आणि विद्या प्रज्ञा पुरस्कारांचे स्वरूप आहे. यावेळी गदिमांचे निकटवर्ती स्नेही आणि महाराष्ट्राचे नामवंत भाषा आणि शिक्षणतज्ज्ञ ज्येष्ठ लेखक डॉ. न. म. जोशी यांचा प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना ज्येष्ठ नाटककार श्रीनिवास भणगे म्हणाले की, गदिमांचे काव्य हे चित्रदर्शी होते. त्या काव्यावर आजही कोणी चित्रपट केल्यास त्याला मानाचा पुरस्कार मिळाल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी पुरस्काराला उत्तर देताना ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे म्हणाल्या की, एखादा पुरस्कार मिळाल्यानंतर आनंद गगनात मावत नाही, असे म्हटले जाते. पण पुरस्कार मिळाल्यनंतरचा आनंद मावण्यासाठी गगनाची का आवश्यकता असते, याचा अनुभव मला आज येतो आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# माझी पहिली कविता

पहिले प्रेम आणि पहिली कविता यांतला आनंद काही अवीटच असतो. ज्याने अनुभवले त्यालाच ते कळेल.



मी १९७५-७६ या शैक्षणिक वर्षात मुंबईच्या अंधेरीतील भवन्स कॉलेजमध्ये कला शाखेच्या पहिल्या वर्षात शिकत होतो. कॉलेजतर्फे एक वार्षिक अंक निघत असे. त्यात विद्यार्थ्यांच्या कथा, कविता, लेख प्रकाशित होतात असे कळले. म्हणून मीही एक कविता लिहिली आणि आमच्या मराठीच्या प्राध्यापकांकडे दिली. कवितेचे शीर्षक होते कान्हाची वाजे मुरली. ती कविता प्रकाशितही झाली! माझा आनंद गगनात मावेना! मी तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा होतो. तारुण्याला शृंगार रस पोषक असतो. त्यामुळे माझ्या कवितेत राधाकृष्णाच्या प्रीतीचा शृंगार रस आळवला होता.

मी ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी असल्याने मला तमाशा आणि कीर्तनातील राधाकृष्ण माहित होते.

*मीच एक राधा गवळ्याची
*जमुनी गौळणी जाऊ चला गं मथुरेच्या बाजारी
*नको वाजवू श्रीहरी मुरली

अशा किती तरी गौळणी मी तेव्हा ऐकल्या होत्या. त्या यावेळी माझ्या कामी आल्या. शिवाय गावी मी चौथी पाचवीत शिकत असताना आमची शालेय सहल नाशिकला गेली होती. तेथे मी चार आण्यात कृष्णावरील एक पुस्तक खरेदी केले होते. अर्थात त्यात कृष्णाने बालपणी आणि मोठेपणी केलेल्या लीला वर्णन केल्या होत्या. अर्थात त्यात राधा किंवा कष्णाची प्रीती मुळीच नव्हती. असे ते शृंगार रसविरहित पुस्तक होते. मी माझ्या आयुष्यात शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त वाचलेले ते पहिलेच अवांतर पुस्तक होते. तरीही मी राधाकृष्णाचा शृंगार वर्णन करून गेलो-

कान्हाची वाजे मुरली
स्वर सुरेल निघती.....अनुभव

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

### (पान १ वरून) राधाकृष्ण विखे पाटलांनी सातव्यांदा घेतली कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ

अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, काकडीचे विमानतळ, न्यायालयाची स्वतंत्र इमारत अशा अनेक ठळक बाबी या त्यांच्या विकासाच्या वाटचालीतील मानबिंदू ठरले आहेत. विकासकामांच्या सक्रियतेमुळेच शिर्डी मतदारसंघातून सलग आठव्यांदा चांगल्या मताधिक्याने निवडून जाण्याचा विक्रमही त्यांनी नोंदविला आहे. कोणत्याही मंत्रिपदाची जबाबदारी आली की, त्या विभागाचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आहे. सरकार आणि संघटना यांचा योग्य समन्वय साधून काम करण्याचा मोठा अनुभव विखे पाटील यांच्या पाठीशी असल्यामुळे जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेला यामुळे गती मिळाल्याचे पाहायला मिळाले. यापूर्वी शिवसेना-भाजपचे सरकार असताना १९९७ ते ९९ या कार्यकाळात कृषी, जलसंधारण, दुग्धव्यवसाय या विभागांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. या काळात ॲग्रो ॲडव्हाटेज हे कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरवून त्यांनी आपल्या कार्याची वेगळी ओळख करून दिली होती.

#### 'होय, मी नाराज आहे'!

यांना महत्त्वाचे पद देण्यात येणार असल्याची देखील माहिती समोर आली आहे. छगन भुजबळ जर नाराज आहेत तर तुमचे अजित पवार किंवा सुनील तटकरे यांच्याशी काही बोलणे झाले आहे का? असा प्रश्न देखील भुजबळ यांना विचारण्यात आला होता. मात्र, मला त्याची काही आवश्यकता वाटली नसल्याचे भुजबळ यांनी सांगितला आहे. मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. मला डावलले काय किंवा फेकले काय? कोणाला काय फरक पडतो? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आयुष्यात अनेकदा मंत्रीपदे मिळाली आहेत किंवा किती वेळा ती गेली देखील आहेत. परंतु छगन भुजबळ अद्याप संपला नाही. तुम्ही मंत्रीपदावर मला प्रश्न विचारण्याऐवजी ज्यांनी डावलले, त्यांना विचारायला हवे, असे देखील भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे. राज्यसभेवर जा, असे पक्षाकडून सांगण्यात आले होते. अशी माहिती देखील भुजबळ यांनी दिली आहे. मी पूर्वी राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छुक होतो. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर आता मी राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छुक नसल्याचे मी पक्षाला स्पष्टपणे कळवले होते, असे देखील भुजबळ यांनी सांगितले आहे. मला माझ्या मतदारांनी निवडून दिले आहे. मग आता मी जर राज्यसभेवर गेलो, तर ती माझ्या मतदारांची प्रतारणा ठरेल, असा दावा त्यांनी केला आहे.

### शिरुरला प्रदुषणामुळे घोडनदीचे पात्र काळवंडले!

किनाऱ्यालगतच्या गावांना समृद्धी बहाल केली आहे. येथील काही गावांना ऐतिहासिक, भौगोलिक वारसा दिला. असे असताना आज नदीकाठवरील लोकवस्तीमधील सांडपाणी आणि रांजणगांव एमआयडीसीच्या केमिकल युक्त प्रदूषित पाण्यामुळे नदीला अवकळा आली आहे. अनेक कारखान्यांतून रासायनिक सांडपाणी बिनदिक्कतपणे घोड नदीत सोडले जाते. त्यामुळे एकेकाळी जैवविविधतेने नटलेली घोड नदी रासायनिक प्रदूषणामुळे बायोलॉजिकली डेड म्हणजेच जैविकदृष्ट्या मृत झाली आहे. नदी वाचवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी शिरुरमधील नागरिकांसह पर्यावरणाप्रेमींकडून आता जोर धरु लागली आहे. घोड नदीच्या दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे यापूर्वी अनेकदा नदीतील मासे मृत्युमुखी पडले आहेत. उग्र दर्पामुळे बऱ्याचदा जनावरेही पाणी पित नाहीत. तसेच पिकेही धोक्यात आली आहेत. विशेष म्हणजे रांजणगाव एमआयडीसीला होणाऱ्या पाणी पुरवठ्या बरोबरच तालुक्यातील अनेक गावांना याच नदीवरुन पिण्याच्या पाणी पुरवठा योजना कार्यरत आहेत. काही नवीन पाणी योजनांची कामेही प्रगतीपथावर आहेत. शेतीसाठी उपसा जलसिंचन योजना सुरु आहेत. शिरुरसह श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्यासाठी याच नदीवरुन पुरवठा सुरु आहे. मात्र असे असताना नदी मधील दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदुषणाबाबत मात्र नागरीकांमध्ये तितकीशी जागरुकता दिसून येत नाही ही गंभीर बाब आहे. कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक पाण्यावर व मैला मिश्रित सांडपाण्यावर प्रक्रिया करुन जलशुध्दीकरण यंत्रणेमार्फत ते सोडले पाहिजे. यावर प्रदुषण नियंत्रण मंडळाने जातीने लक्ष दिले तर घोड नदीच्या नशिबी आलेले भोग नक्कीच थांबू शकतात.

### आ. कर्डिले यांना "२०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दी इयर' पुरस्कार

चेअरमन ऑफ दि इयर चा पुरस्कार राष्ट्रीय सहकारी संघ,नवी दिल्लीचे चेअरमन माजी खा.दिलीप संघवी यांच्या हस्ते देण्यात आला. या प्रसंगी गोवा विधानसभा अध्यक्ष अनंत शेट, गोवा राज्याचे सुभाष फलदेसाई आदी उपस्थित होते. पुरस्कार स्विकारल्यानंतर जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार कर्डिले म्हणाले,जिल्हा बँकेवर विश्वास ठेवून रुपये दहा हजार कोटीच्या वर ठेवीददरांनी ठेवी ठेवल्या. जिल्हा बँक व सामाजिक कार्याच्या माध्यमातून शेतकरी व समाजातील शेवटचा घटकांची सेवा करण्याचे कार्य केल्याने मला हा पुरस्कार मिळाला.

# अळकुटीत ५२० रूग्णांची नेत्र तपासणी

## ३३१ रूग्णांना चष्मा वाटप | ६१ रूग्णांवर होणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**अळकुटी : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून व राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि नीलेश लंके प्रतिष्ठणच्या वतीने शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी, चष्मा वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांतर्गत रविवारी अळकुटी येथे पार पडलेल्या शिबिरात ५२० रूग्णांची तपासणी करण्यात येउन ३३१ रूग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले.६१ रूग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.**

लंके दाम्पत्याच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेला हा उपक्रम येत्या ५ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. संपूर्ण पारनेर-नगर मतदारसंघात ही शिबिरे घेण्यात येणार आहेत. रविवारी सकाळी अळकुटी येथे शिबिरास सुरूवात झाल्यानंतर मोठया संख्येने रूग्णांनी तपासणीसाठी हजेरी लावली होती.

यावेळी बाबाजी भंडारी, डॉ. भास्कर शिरोळे, बाळासाहेब पुंडे, दत्तात्रेय म्हस्के, किरण पानमंद, गणेश मापारी, संदेश कापसे, दिनेश चौगुले, हनुमंत भोसले, संतोष काटे, बाळासाहेब गुजर, राहुल गाडगे, महेश भास्कर शिरोळे, महेश सदाशिव शिरोळे, सुभाष पुंडे, अनिल आवारी, प्रविण साबळे, पुर कुरेशी, कुंदनकाका साखला, सचिन साखला संजय मते, गणेश जाधव, बंटी दाते, शुभम शिरोळे, संतोष शिंदे, मारूती म्हस्कुले, अनिल गंधाक्ते, आरिफ पटेल, शरद घोलप, संतोष खाडे, किरण जमदाडे, सुदाम म्हस्के, भाउ गाडगे, सुनील गाडगे, धोंडीभाऊ झिंजाड, निवृत्तीनाना गाडगे, किरणशेठ डेरे, पांडूरंग येवले, अनिल चौधरी, बाळासाहेब कवडे, तुकाराम कवडे, प्रविण कदम आदी यावेळी उपस्थित होते.



नीलेश लंके व राणी लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या नेत्रतपासणी शिबिरास अळकुटीत मोठा प्रतिसाद लाभला.

### रूग्णांच्या चेहऱ्यावरील समाधानातच आनंद

अत्याधुनिक मशिनरीद्वारे नेत्र तपासणी करून मोफत चष्मा हाती पडल्यानंतर सबंधित रूग्णाच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान यातच आम्ही लंके समर्थकाना समाधान आहे. मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेचे निदान झालेल्या रूग्णांवर लवकरच मोफत शस्त्रक्रिया करण्यात येतील.

बाळासाहेब पुंडे

### खा. लंके यांच्या संवेदनशिलतेला सलाम

मतदारसंघातील प्रत्येक नागरीकांच्या आरोग्यासाठी खा. लंके हे नेहमीच सजग असतात. त्यांच्या या संवेदनशिलतेला सलाम केला पाहिजे. कोरोना संकट असो वा कोणताही अजार असो, खा. नीलेश लंके हे त्यांच्या परीने मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करतात. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून त्यांनी सर्वाधिक मदत मिळवून दिली असून पंतप्रधान सहायता निधीमध्येही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे.

डॉ. भास्कर शिरोळे, मा. पंचायत समिती सदस्य

### सामाजिक उपक्रम सुरूच राहणार

गेल्या पंधरा वर्षांपासून खा. नीलेश लंके हे विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनतेसाठी सुविधा उपलब्ध करून देत आहेत. विधानसभा निवडणूकीत राणीताई लंके यांचा निसटता पराभव झाल्यानंतर लंके यांचे हे उपक्रम सुरू राहणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र निकालाच्या दुसऱ्याच दिवसापासून लंके परिवाराने आपल्या कामाला सुरूवात केली करीत आपली नाळ जनतेशी जोडली गेलेली आहे. हे दाखवून दिले. लंके परिवाराकडून हाती घेण्यात येत असलेले उपक्रम अव्याहतपणे सुरूच राहणार असून त्यात कोणताही खंड पडणार नाही.

नुर कुरेशी
नीलेश लंक प्रतिष्ठाण अळकुटी

### ना थकणार ना थांबणार !

खा. नीलेश लंके व त्यांच्या परिवाराची नाळ सर्वसामान्य जनतेशी जोडलेली आहे. त्यामुळे हे कुटूंब दररोज नागरीकांच्या सुख, दुःखात सहभागी होताना आपण नेहमीच पाहतो. निवडणूका येतील जातील, जय पराजय सुरूच राहतात. मात्र ना थकणार ना थांबणार या भावनेतून लंके परिवाराचे कर्तव्य कधीही चुकणार नाही.

महेश भास्करराव शिरोळे
विश्वस्त,खंडोबा देवस्थान, पिंपळगांवरोठा

# स्वामींच्या कृपेनेच मी आमदार!

## आ. दाते स्वामींचरणी नतमस्तक | माळकुप येथे दत्त जयंती उत्सव संपन्न | हजारो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

**माळकुप : प्रतिनिधी**

**आपण श्री.स्वामी समर्थांचे सेवेकरी असून स्वामींच्या कृपेनेच आमदार झाल्याचे सांगत माळकुपच्या देवस्थानासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.**



माळकुप येथील स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती निमित्त आयोजित केलेल्या उत्सवात दाते बोलत होते. उत्सवानिमित्त कावड जलाभिषेक,अभिषेक व पूजन पालखी मिरवणूक, होम हवन, अशोक महाराज केंगे यांचे कीर्तन , दत्त जन्म सोहळा आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.हजारो भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

आमदार दाते पुढे म्हणाले की, आपण जिल्हा परिषदेच्या कृषी व बांधकाम समितीचे सभापती असताना येथील स्वामी समर्थ मंदिरासाठी सभा मंडप दिला आहे.राज्यात व केंद्रात महायुतीची सत्ता असल्याने स्वामी समर्थ मंदिराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी माळकुपचे सरपंच संजय काळे यांनी देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी किरण पंडित,डॉ.प्रदीप दाते ,बाळासाहेब शिंदे,संदीप ठुबे, पत्रकार शिवशंकर शिंदे, किरण शिंदे ,डॉ. संजय नाबगे ,पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक हरिभाऊ कदम, संतोष रोहोकले सर ,चेतन कुंभकर्ण,उद्योजक सुमित रोहोकले, योगेश कुंभकर्ण ,दीपक शिंदे, योगेश शिंदे, निलेश शिंदे, राजुशेठ नाबगे, गंगाधर नाबगे आदी मान्यवर तसेच स्वामी सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खामकरवाडीच्या एकोप्यातून बंधूभावाची शिकवण

## दीपक लंके यांचे प्रतिपादन | खामकरवाडीत दत्त जन्मोत्सव सोहळा

**शिरापूर : प्रतिनिधी**

**गेल्या ३६ वर्षांपासून खामकरवाडीतील त्रिमुर्ती मळयात दत्त जन्मोत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात येत असून या सोहळयाच्या निमित्ताने खामकरवाडीकरांकडून ऐक्य व एकोप्यातून बंधूभावाची शिकवण मिळते असे प्रतिपादन खा. नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांनी केले.**



शिरापुरच्या खामकरवाडीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दत्त जन्मोत्सव सोहळयास दीपक लंके यांनी उपस्थित राहून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी ठकाराम लंके, हनुमंत भोसले, बंटी दाते, मारूती गाडगे, आनंद नरसाळे यांच्यासह अनेक मान्यवर, भाविक उपस्थित होते.

यावेळी लंके म्हणाले, या भागातील नागरीकांचे खा. नीलेश लंके यांच्यावर विशेष प्रेम आहे. त्यांच्या या प्रेमाविषयी आमचा परिवार कृतज्ञ आहे. या नागरीकांनी सभामंडपाची मागणी केल्यानंतर खा. लंके यांनी यंदाची दत्त जयंती सभामंडपात होईल असा शब्द देत तो पुर्ण केल्याची आठवणही लंके यांनी करून दिली.

या सोहळयामध्ये शनिवार दि. १४ रोजी सकाळी ८ ते १० मांडव डहाळे व विणा पुजन, सकाळी १० ते ३ श्रींचा अभिषेक व होम हवन, सायंकाळी ६ ते ८.३० दत्त जन्मोत्सव व संदीप महाराज नायकोडी यांचे दत्त जन्माचे किर्तन, रात्री ८.३० ते ९.३० महाप्रसाद, रात्री १० ते १२ सविंदणे येथील कानिफनाथ महाराज प्रासादीक भजनी मंडळाचे भजन, रविवार दि. १५ रोजी सकाळी ८ ते ९ श्रींचा पालखी सोहळा, सकाळी १० ते ११.३० संतोष महाराज बढेकर यांचे काल्याचे किर्तन तर दुपारी १२ ते १ अमोल वाजे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# सुशिला डोळ निवर्तल्या

## विजय डोळ यांना मातृशोक

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर शहरातील जुन्या पिढीतील धार्मिक वृत्तीच्या ज्येष्ठ नागरीक सुशीलाबाई बाबूराव डोळ यांचे सोमवारी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या. पारनेरचे माजी उपसरपंच विजय डोळ यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परीवार आहे.**

आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक क्षेत्रासाठी वाहून घेतलेल्या सुशिलाबाई यांनी आपल्या मुला मुलींवर चांगले संस्कार करत समाजासाठी योगदान देण्याची शिकवण त्यांनी दिली. पती स्व. बाबूराव डोळ यांच्या निधनानंतर कुटूंबाची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर त्यांनी ती चोख बजावली. मुलांना वडिलांची कमतरता भासणार नाही याची त्यांनी काळजी घेतली.

सोमवारी दुपारी पारनेरच्या स्मशानभुमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस गुणेश महाराज पारनेरकर, दीपक लंके, गंगाराम बेलकर, बाबाजी तरटे, बापूसाहेब शिर्के, अर्जुन भालेकर, अशोक चेडे, चंद्रकांत चेडे, दिपक शिंगवी, शकील शेख, राजू शेख, विलास घोडके, सुनील बोरा, डॉ. बाळासाहेब कावरे, योगेश मते, विजय भा. औटी, नंदू देशमुख यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

### आपला ईश्वर !

आई म्हणजे आपला ईश्वर ! आईची सेवा करण्याचे भाग्य विजय यांना लाभले. स्व. सुशिलाबाई यांची पारनेरकर महाराजांवर मोठी श्रध्दा होती. त्यांनी शेवटपर्यत उपासना सोडली नाही. विशेषतः विठ्ठलाच्या काकडयाला त्या कधी चुकल्या नाहीत. शेवटच्या क्षणापर्यंत विठ्ठलाच्या सेवेचा त्यांचा ध्यास असायचा. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण पुर्णवाद परिवाराला दुःख झाले आहे. त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली.

गुणेशदादा पारनेरकर

### आदर्श मातेला मुकलो

शिवसेनेमध्ये काम करण्यास सुरूवात केल्यानंतर विजय डोळ यांच्या माध्यमातून सुशिला काकींची ओळख झाली. प्रत्येक भेटीमध्ये त्या प्रेमाने विचारपुस करीत, मोलाचे सल्ले देत. आपल्या मुला-मुलींना त्यांनी सुसंस्कृत नागरीक घडविले. त्यांचा जीवनपट पाहिला तर एक आदर्श माता म्हणून त्यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. अशा आदर्श मातेला आपण मुकलो. त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली.

दिल्लीवरून खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

# संदीप झंजाड यांना सलग सातव्यांदा एमडीआरटी पुरस्कार

## विमा प्रतिनिधींची अमेरिकेत होणार परिषद



**पारनेर : प्रतिनिधी**

**भारतीय आयुर्विमा महामंडळामध्ये गेल्या १६ वर्षे उत्कृष्ट काम करणारे चिंचोली येथील शेतकरी कुटूंबातील संदीप भाउसाहेब झंजाड यांना सलग सातव्या वर्षी एमडीआरटी पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. अमेरिकेतील फ्लोरीडात पार पडणाऱ्या विमा प्रतिनिधींच्या परिषदेमध्ये झंजाड यांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे.**

अमेरिकेतील विमा परिषदेमध्ये झंजाड यांची नगर जिल्हयातून प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे. झंजाड यांना आतापर्यंत एकूण ११० राष्ट्रीय व १९ आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बारा देशांमध्ये त्यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. विमा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांनी देशात व देशाबाहेर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सलग सातव्यांदा या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल भारतीय आयुर्विमा महामंडळाचे शाखा व्यवस्थापक कटके, सणस, प्रशासन अधिकारी पठारे, विकास अधिकारी धनंजय देशमुख यांनी अभिनंदन केले.

यावेळी बोलताना झंजाड यांनी सांगितले की, माझे सर्व विमाधारक, युवा उद्योजक, मित्रपरिवार, कुटूंबिय, चिंचोली येथील अंचलेश्वर पतसंस्था परिवार, पिंपरीजलसेन, गांजीभोयरे, लोणीमावळा, निघोज ग्रामस्थ यांचे मला मोलाचे सहकार्य लाभले. झंजाड यांच्या या यशाबद्दल दोस्ती ग्रुप, शिवराज्य हॉलीबॉल ग्रुप, सर्व कांदा व्यापारी तसेच मित्र परिवाराच्या वतीने अभिनंदन करण्यात येऊन शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या या कामगिरीबद्दल पारनेर तालुक्यातूनही त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# ध्येय निश्चित करा, यशस्वी व्हाल!

## प्राचार्य डॉ. रविंद्र चोभे यांचा कानमंत्र | गुरूदेव प्रशालेत क्रीडा महोत्सव

**सुपा : प्रतिनिधी**

**शिक्षण असो व खेळ विद्यार्थ्यांनो प्रथम तुम्ही तुमचे ध्येय निश्चित करा आणि ते गाठण्यासाठी परीश्रम घ्या तुम्ही तुमचे ध्येय गाठल्याशिवाय राहणार नाहीत, जीवनात यशस्वी व्हाल असा कानमंत्र नगरच्या विद्या प्रतिष्ठाणचे प्राचार्य रविंद्र चोभे यांनी विद्यार्थ्यांना दिला.**



वाघुंडे येथील गुरूदेव प्रशालेमध्ये दि.१३ व १४ डिसेंबर रोजी दोन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सव पार पडला. या महोत्सवाचे उद्घाटन चोभे यांच्या हस्ते करण्यात आले. तालुका क्रीडा संचालक संजय गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक मोनिका जेजोट, प्रशालेचे अध्यक्ष संतोष मगर, संस्थापक सुभाष मगर हे यावेळी उपस्थित होते.
यावेळी बोलताना चोभे म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात सध्या स्पर्धा आहे. त्यासाठी आपण आपल्या क्षेत्रात परिपूर्ण कसे होऊ यासाठी नियोजबध्द परिश्रम करायला हवेत. अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्व दिले तर तुमचे अरोग्यही सुदृढ राहण्यास मदत होईल असा सल्ला त्यांनी दिला.

या महोत्सवात पहिल्या दिवशी ऑबस्टी रेस, टग ऑफ वॉर, कबडडी, खो-खो, फनी गेम्स अशा स्पर्धा पार पडल्या. खेळ हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे शिक्षक बँकेचे मा. अध्यक्ष गोकुळ कळमकर यांनी सांगितले. तर संस्थेच्या संचालिका शोभा शिर्के यांनी क्रीडा शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत हे शिबिर आयोजित केल्याबद्दल शिक्षकांना धन्यवाद दिले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी खेळाडूंना गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांबरोबरच पालकांसाठीही फनी गेम्सचे आयोजन करण्यात येऊन पालकांनाही बक्षिस देऊन गौरविण्यात आले. समारोप समारंभास श्रीराम थारात, गोकुळ कळमकर, मधुकर शिर्के, शोभा शिर्के, श्री व सौ दोरगे हे उपस्थित होते. संभाजी मते यांनी सुत्रसंचलन केले. बाबाजी साळुंके, तुषार कदम यांनी महोत्सवाच्या यशस्वीतेसा योगदान दिले.

### हार जीत होणारच

शरीर संपदेसाठी आपल्या जीवनात खेळाला महत्व दिले पाहिजे. खेळामध्ये हार जीत होणार. जीत किंवा हार स्विकारता आली पाहिजे. या संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवात यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन

मनिषा जेजोट
सहा. पोलीस निरीक्षक, सुपा

### गुरूदेव प्रशालेची गुणवत्ता

सर्वश्रुत आहे. आपण गुणवत्तेत अव्वल आहोत, आता आपण खेळातही नावलौकिक कमाऊ या. शारीरीक तंदुरूस्ती विद्यार्थ्यांना मानसिक व बैध्दीक विकास होण्यासाठी मोलाची मदत करते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने खेळाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहावे.

संतोष मगर
अध्यक्ष, गुरूदेव प्रशाला

### संधीचा लाभ घ्या

गुरूदेव शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना वेगवेगळया संधी उपलब्ध करून देते. या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, तुमचे भविष्य उज्वल झाल्याशिवाय राहणार नाही. अभ्यासाबरोबरच खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी प्रयत्न करा.

श्रीराम थोरात

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com